# हवामान आधारीत कृषि सल्ला


## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**


**<u>६६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६/१०/२०२०</u>**

**जिल्हा : अहमदनगर**

| मागील आठवड्यातील हवामान (०६/१०/२०२० ते १२/१०/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानअंदाज (१४/१०/२०२० ते १८/१०/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ०.० | ०.० | ७.६ | ३.० | ०.० | ३७.४ | पाऊस (मिमी) | १२ | ३ | २७ | २२ | १५ |
| ३३.० | ३२.० | ३२.० | २९.२ | ३०.८ | ३०.६ | २९.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३१ | ३१ | ३० | ३२ |
| २३.५ | २४.४ | २४.९ | २१.५ | २२.७ | २४.१ | २३.४ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २३ | २३ | २२ | २३ |
| ०.२ | ०.० | ०.२ | ०.२ | ०.१ | ०.० | ०.२ | ढगस्थिती (आकाश) | ६ | ८ | ७ | ८ | ८ |
| ९५.० | ८२.० | ८६.० | ९६.० | ९७.० | ८७.० | ९५.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ९० | ९१ | ९३ | ९२ |
| ५०.० | ४९.० | ६८.० | ५४.० | ५९.० | ६४.० | ७३.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ५८ | ५९ | ७० | ६७ |
| १.७ | १.६ | १.३ | ०.६ | १.५ | ०.८ | ३.० | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ६ | ६ | १० | ९ | १३ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील तसेच वादळी वाऱ्यासह काही ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **खरीप पिकाची काढणी शिल्लक असल्यास पावसाची उघडीप बघून काढणी करून घ्यावी.**<br>**काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.**<br>**पाऊस थांबल्यानंतर व वापसा आल्यानंतरच रब्बी पिकाची पेरणी करावी.**<br>**पिकांमध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी आणि साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.**<br>**पावसाने उघडीप दिल्यास पिकात करावायाची कामे पुर्ण करावीत . (आंतरमशागतीची, तणषनयंत्रणाची, खते देणे, फवारणी इ.)**<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>विजेचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल . शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत . तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>पावसाळ्यात फवारणी करतांना स्टीकरचा वापर करावा.<br>पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | पिकाची काढणी शिल्लक असल्यास उघडीप बघून काढणी करून घ्यावी. काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. पाऊस थांबल्यानंतर व वापसा आल्यानंतरच रब्बी पिकाची पेरणी करावी. |
| कापूस | बोंड धरणे | जमिनीत पावसाचे पाणी साचून राहिले असल्यास चर खोदून पाणी बाहेर काढावे. कपाशी पिकामध्ये पाणी साचल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.<br>मर रोगाची लक्षणे दिसू लागताच १.५ किलो युरिया + १.५ किलो पालाश १०० लिटर पाण्यात मिसळून १५० ते २०० मिली आळवणी प्रत्येक झाडाच्या बुंध्याजवळ द्यावे.<br>त्यानंतर ८-१० दिवसांनी २ किलो डिएपी १०० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण १५० ते २०० मिली प्रत्येक झाडाच्या बुंध्याजवळ ओतावे व लगेच पाणी द्यावे. |
| ऊस | | जमिनीत पावसाचे पाणी साचून राहिले असल्यास चर खोदून पाणी बाहेर काढावे. जर ऊस पडलेला किंवा कललेला असेल तर दोन ओळीतील ऊस एकमेकांना बांधून आधार द्यावा. सरीतील पाणी ओसरताच ऊस पिकास ५० किलो युरिया व ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति हेक्टर या प्रमाणे बुस्टर डोस द्यावा. ठिबक सिचनाची सोय असेल तर खते ठिबक सिचनाच्या सहाय्याने द्यावीत. वाफसा येतास ऊसाच्या बुडख्यास मातीची भर लावावी. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | जमिनीत पावसाचे पाणी साचून राहिले असल्यास चर खोदून पाणी बाहेर काढावे. शेतात पाणी साचल्याने पिक पिवळे पडु लागल्यास १ % युरियाची फवारणी करावी. |
| भाजीपाला पिके | | सततच्या पावसामुळे भाजीपाला पिकांवर करपा रोग संभवतो. त्यासाठी उघडीप मिळाल्यानंतर मॅन्कोझेब २५ ग्रॅ. किंवा कॉपर ऑक्सिक्लोराई २५ ग्रॅ. किंवा अझोक्सोस्ट्रोबीन १० मिली. 10 लि. पाण्यात मिसळुन रोग दिसताच दिवसाच्या अंतराने २-३ फवारण्या आलटून पालटून द्याव्या. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**


| | | |
|---|---|---|
| जनावरांचे व्यवस्थापन | | पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>पावसाळ्यात जनावरांना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा प्रमाणात द्यावा. पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हौदातून संपूर्ण खुर बुडतील अशा सोडाव्यात. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १३/१०/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**